अधिसूचना

क्र. - ४/२०२१ दिनांक - ७.१.२०२१

विषय : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ..... अधिष्ठाता तदर्थ नामनिर्देशनाबाबत

संदर्भ : १) असाधारण अधिसूचना क्र. ३०/२०१८, दि. १३.४.२०१८
२) असाधारण अधिसूचना क्र. ३५/२०१९, दि. १६.४.२०१९
३) असाधारण अधिसूचना क्र. ४०/२०२०, दि. २०.४.२०२०

संदर्भीय क्र. १) वरील अधिसूचनेमध्ये उल्लेखीत विद्यापीठ प्रस्ताव व त्यानुषंगाने मा.कुलपती कार्यालयाने दिलेल्या मान्यतेच्या अधिन राहून अधिसूचनेतील उल्लेखीत विद्याशाखांकरीता अधिष्ठात्यांचे तदर्थ नामनिर्देशन करण्यात आले होते. सदर नामनिर्देशनाचा कालावधी दि. १२.४.२०१९ रोजी संपुष्ठात येत असल्यामुळे, संदर्भीय क्र. २) वरील अधिसूचनेच्या माध्यमातून सदर नामनिर्देशनाचा कालावधी पुन्हा एक वर्षासाठी वाढविण्याला मा.कुलगुरूंनी मान्यता प्रदान केली होती सदर्हू कालावधी हा दि. १२.४.२०२० रोजी संपुष्ठात आला.

दरम्यानच्या काळात विद्यापीठाला नियमीत अधिष्ठात्यांची दोन पदे भरण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून मान्यता मिळाल्यामुळे (१) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा आणि (२) मानवविज्ञान विद्याशाखा या दोन विद्याशाखांकरीता नियमित अधिष्ठात्यांची नियुक्ती करण्यात आली. परंतु उर्वरीत विद्याशाखांकरीता आवश्यक असलेल्या अधिष्ठात्यांची दोन पदे भरण्याला महाराष्ट्र शासनाकडून अजूनही मान्यता मिळालेली नाही. यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. सदर्हू उर्वरीत विद्याशाखांच्या विद्यापीठ शैक्षणिक कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊ नये म्हणून संदर्भीय क्र. ३) वरील अधिसूचनेच्या माध्यमातून संदर्भीय क्र. १) वरील अधिसूचनेमध्ये उल्लेखीत वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांसमोर दर्शविलेले तदर्थ अधिष्ठाते दि. १३.४.२०२० पासून पुन्हा एक वर्ष कालावधीसाठी किंवा नविन अधिष्ठात्यांची नियुक्ती होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल अशा कालावधीसाठी नामनिर्देशनाच्या कालावधीमध्ये वाढ करण्याला मा.कुलगुरूंनी मान्यता प्रदान केली आहे.

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, डॉ.सौ.एम.पी.काळे, प्राध्यापक, पद.शैक्षणिक गृहविज्ञान विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ ह्या नियत वयोमानानुसार दि. ३१.१२.२०२० रोजी विद्यापीठाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांनी धारण केलेले आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे तदर्थ अधिष्ठाता हे पदही आपोआप संपुष्ठात आले आहे. सदर विद्याशाखेच्या विद्यापीठ शैक्षणिक कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊ नये म्हणून मा.कुलगुरूंनी प्रा.डॉ.वैशाली गुडधे, प्राध्यापक, पद.शैक्षणिक ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सदर्हू विद्याशाखेच्या तदर्थ अधिष्ठाता पदावर नामनिर्देशीत केले आहे. त्यांची नियुक्ती एक वर्ष कालावधीकरीता किंवा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १५(३) मध्ये नमुद पदावधी यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत असेल.

स्वा/-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****